PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Bin Kamacha Navra
Year: 1984

Song: Ain Dupari Kay Zaal
Lyricist: Santaram Nandgaonkar

ऐन दुपारी काय झालं
ऐन दुपारी आड वाटंनं
चोरून साजण आला
अय्या
हां ऐन दुपारी आड वाटंनं
चोरून साजण आला
धरलं त्यानं हाताला
भिडला माझ्या गालाला
असं
आता बाई पुढलं मी सांगू कशी
आता बाई पुढलं मी सांगू कशी
बोला पुढलं ही सांगलं कशी
गं बाई बाई बाई बाई
पुढलं ही सांगलं कशी

मी जात होते पाण्याला
तो चोर तिथं आला
घातला हात पदराला
रानात घेऊन गेला
गळा घाली गळयात
उसाच्या मळयात
साखरेच्या पाकाची गोडी
हो सारं आलं जुळून
मन गेलं फुलून
घुमे बाई पारव्याची जोडी
असं जुळता झाली रात
बाई चांदाची बरसात
आता बाई पुढलं मी सांगू कशी
आता बाई पुढलं मी सांगू कशी

बोला पुढलं ही सांगंल कशी
गं बाई बाई बाई बाई
पुढलं ही सांगंल कशी
झिंगून पुरता फड गेला
पावसानं दंगा केला
दचकून उघडला डोळा
सांजचा पार आला
सखयाच्या संगानं
नवतीच्या रंगानं
मोहरून जोडलं नातं
हां भिती बाई मनात
सांगू कशी जनात
नको ते घडलं होतं
लई बाई घाई झाली
माझ्या हाती पैरण आली
आता बाई घडलं ते सांगू कशी
आता बाई घडलं ते सांगू कशी
बोला ही घडलं ते सांगल कशी
बोला ही घडलं ते सांगल कशी

हो ऐन दुपारी आड वाटंनं
चोरून साजण आला
अय्या
हां ऐन दुपारी आड वाटंनं
चोरून साजण आला
धरलं त्यानं हाताला
भिडला माझ्या गालाला
आता बाई घडलं ते सांगू कशी
आता बाई घडलं ते सांगू कशी

बोला ही घडलं ते सांगल कशी
गं बाई बाई बाई बाई
घडलं ते सांगल कशी

अहो दाजीबा घडलं ते सांगल कशी
बोला बोला घडलं ते सांगल कशी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*